दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -९२ रविवार,दि.०८ डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-92 Sunday, Dt.08 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

दै.समर्थ राजयोग
**CHANGE IN NAME**
I have Change My name From,
TOTARE SATISH BHIMRAO to ,
TOTRE SATISH BHIMRAO
Hence for this declaration in future
OLD NAME : TOTARE SATISH BHIMRAO
NEW NAME : TOTRE SATISH BHIMRAO
Address : A/p Doithan, Tq.Ashti, Dist.Beed
Mo.No.9623309515
Adhar No. 209121352516

# बीड येथील बनावट औषधांचे भिवंडी कनेक्शन

## नारपोलीतील कंपनीविरोधात गुन्हा दाखल

**बीड: जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बनावट औषध साठा होत असल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून या गुन्ह्याच्या तपासाची पाळेमुळे भिवंडीपर्यंत पोहचली आहेत. भिवंडीतून बनावट औषध साठा पुरविणाऱ्या इसमांविरोधात बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडीतील नारपोली येथील मे.क्रेटीस बायोटेक प्रा.लि.कंपनीचे संचालक मिहीर त्रिवेदी आणि द्विती सुमित त्रिवेदी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**बीड येथील बनावट औषध पुरवठा प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या तपासात बनावट औषधांची तपासणी बीड येथील शासकीय औषध निरीक्षकांनी केली. त्यामध्ये मेसर्स उत्तराखंड येथील प्रीस्टल फॉर्मुलेशन या अस्तित्वात नसलेल्या बनावट कंपनी कडून उत्पादित केलेल्या अझीमसीम ५०० टॅबलेट चा नमुना चाचणीसाठी घेण्यात आला होता.**

**मुंबई येथील शासकीय औषध परीक्षण प्रयोगशाळेत हे औषध बनावट असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर बीड येथील औषध निरीक्षक यांनी तपासास सुरवात केली असता ई निवेदेद्वारे २५ हजार ९०० रुपयांची औषधे कोल्हापूर येथील मे. विशाल एन्टरप्राईजेस यांनी औषध पुरवठा केल्याचे स्पष्ट झाले.**



कोल्हापूरच्या कंपनीकडून औषधे खरेदी विक्रीबाबत कागदपत्रांची चौकशी केली असता या औषधांचा पुरवठा भिवंडी नारपोली येथील मिहीर त्रिवेदी व द्विती सुमित त्रिवेदी यांच्या मालकीच्या मे.क्रेटीस बायोटेक प्रा.लि.आणि सुरत दिंडोली येथील मे. फार्मासिक्स बायोटेक यांच्याकडून खरेदी केल्याचे तपासात स्पष्ट झाले.

भिवंडीतील कंपनी मालकांनी सदरचा औषध पुरवठा हा मे.काबीज जेनेरिक हाउस मिरा रोड, ठाणे यांचेकडून खरेदी करून कोल्हापूर येथील विशाल एन्टरप्राईजेस यांना वितरीत केला होता. तर सुरत येथील मे. फार्मासिक्स बायोटेक या कंपनीने देखील बनावट औषध साठा भिवंडी येथील मे.क्रेटीस बायोटेक प्रा.ली.कंपनी यांच्याकडून घेऊन कोल्हापूर येथील मे. विशाल एन्टरप्राईजेस या कंपनीकडे दिल्याचे तपासात समोर आले आहे.

पैसे कमावण्याच्या उद्देशाने मालाची आणि कंपन्यांची हेराफेरी करून हा बनावट औषधसाठा वितरित होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या तपासात मीरा भाईंदरच्या कंपनी मालकाला या आधीच बनावट औषध प्रकरणात अटक केल्याचे तपासात समोर आले आहे. मिरा भाईंदर कंपनीने डेहराडूनच्या कंपनीकडून औषध खरेदी केल्याचे सांगितले होते. मात्र त्या ठिकाणी अशी कोणतीही औषध कंपपनी अस्तित्वात नसल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे या बनावट औषधाचे काळाबाजार करणारे मोठे रॅकेट असण्याची दाट शक्यता आहे.

## लिंगायत समाजाला मंत्रीमंडळात एक कॅबिनेट आणि एक राज्य मंत्रीपद द्यावे

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील चाळीस एक मतदार संघात वीरशैव लिंगायत समाजाची ताकद असून देखील आज सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या मागासलेपण कायम आहे. आणि म्हणूनच गेल्या अनेक वर्षांपासून सामजिक, आर्थिक आणि राजकीय विकास धारे पासून हा समाज कोसो मैल दूर आहे. राजकीय समीकरणे बदलण्याची ताकद असलेल्या वीरशैव लिंगायत समाजाला सर्वांगीण विकासात मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. यासाठी लिंगायत समाजाला नव्या मंत्री मंडळात एक कॅबिनेट आणि एक राज्य मंत्रीपद द्यावे अशी समाजाची मागणी अखिल वीरशैव लिंगायत महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. विजय जंगम ( स्वामी) यांनी केली आहे. मुंबई उपनगरातील घाटकोपर येथे पत्रकारांशी औपचारिक गप्पा मारताना विजय जंगम स्वामी यांनी वरील भाष्य केले. याप्रसंगी अँड. स्मिता चिपळूणकर, ऊर्जा फाउंडेशनचे राहुल अग्रवाल, महासंघाच्या समन्वयक रोहिणी जंगम आदी उपस्थित होते. यावेळी पत्रकार परिषदेत स्वामी म्हणाले की नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत वीरशैवलिंगायत समाजाचे त्या त्या राजकीय पक्षांत असलेले सहा समाजबांधव आमदार झाले आहेत. यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दोन आमदार, भारतीय जनता पार्टी चे तीन आमदार आणि जन सुराज्य शक्तीचे विनय कोरे हे सहा आमदार झाले आहेत. या सर्वांचे स्वागत आहे. हे लोकप्रतिनिधी आपल्या मतदार संघा बरोबरच समाजाचा आवाज विधान सभेत उठवतील यात शंका नाही. महाराष्ट्रात जवळपास चाळीसेक मतदार संघात वीरशैव लिंगायत समाजाचे प्राबल्य आहे. हे कोणीही नाकारू शकत नाही अशात समाजाच्या प्रतिनिधीना नव्या मंत्री मंडळात स्थान मिळाले पाहिजे.

यातील चार आमदार महायुतीचे आहेत या पैकी एकाला कॅबिनेट आणि एकाला राज्य मंत्रिपद देऊन समाजाला न्याय द्यावा तसेच समाज बांधव पराजित झाले आहेत त्यांना महामंडळ किंवा एमएलसी देऊन पुनर्वसन करावे अशी मागणी अखिल वीरशैव लिंगायत महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. विजय जंगम (स्वामी) यांनी केली आहे.

## विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत राज्यकर्त्यांना शेतकरी आत्महत्यांचा पडला विसर !

### आजवर ७९० शेतकऱ्यांच्या आत्महत्या तरीही सरकारला घाम फुटेना ?

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत सगळ्यात राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्ये कडे दुर्लक्ष केले आहे. कापूस, सोयाबीनला कमी भावाच्या भोवती निवडणुकीचा प्रचार फिरला. परंतु मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबविण्याबाबतचे उपाय शोधण्याबाबत कुठल्याही राजकीय पक्षाने जाहीर प्रचारातून एकही शब्द काढला नाही. सप्टेंबर ऑक्टोबर आणि नोव्हेंबरच्या २५ तारखेपर्यंत मराठवाड्यात १८० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.आजवर ७५७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. त्यातील ४४७ प्रकरण शासन मदतीस पात्र ठरले ५७ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. ५३ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आल्याचे विभागीय प्रशासनाने शासनास पाठविण्यात आलेल्या अहवालात म्हटले आहे. नोव्हेंबरचा अहवाल अद्याप आलेला नाही. ३३ आत्महत्या या महिन्यात आजवर झाल्या असून ७९० आत्महत्या मराठवाडा विभागात झाल्याचा अंदाज आहे. ही गंभीर आणि चिंतेची बाब आहे. याकडे मात्र राज्यकर्त्यांचे सोयीस्कर दुर्लक्ष झाले आहे जे संतापजनक आहे.



विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत राहिल्या.निवडणुकीची रणधुमाळी संपली, निकालही लागले. यादरम्यान कुठलाही राजकीय पक्ष वा नेता शेतकऱ्यांच्या सिंचनावर, आर्थिक, सामाजिक प्रश्नावर बोलला नाही. याउलट एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यातच प्रचार रंगला. मराठवाड्याच्या वाटेला आलेला ओला दुष्काळ,नापिकी, दुष्काळग्रस्त मराठवाडा, सिंचन अनुशेष आणि सावकारी पाशात अडकलेला शेतकरी या प्रश्नावर कुणीही बोलले नाही. ही अत्यंत खेदाची व दुर्दैवी बाब आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे होऊनही नुकसानीची मदत नाही. शेतकऱ्यांचे यंदाच्या पावसाळ्यात दोन टप्प्यात नुकसान झाले जून ते ऑगस्ट व सप्टेंबर ते ऑक्टोबर पर्यंत पावसाने केलेले नुकसानीमुळे विभागातील ३४ लाख ३९ हजार शेतकऱ्यांचे पिक वाया गेले आहे.विधानसभा निवडणूक आचारसंहितेत या नुकसानीची मदत अडकली. प्रशासन आणि शासन यांच्यातील असमन्वयाचा फटका या मदतीला बसला.

(उर्वरीत पान २ वर)

## निराधाराचा आधार, वर्दीतील दानवीर पो.उपनिरीक्षक सूर्यकांत (राजूभाऊ) गुळभिले यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

बीड /प्रतिनिधी

निराधाराना मदत केली पाहिजे असे सर्वांनाच वाटते पण बोटावर मोजता येतील इतकेच लोक समाजसेवा करीत असतात. निराधारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत असतात. त्यापैकी एक म्हणजे बीडचे भूमिपुत्र पोलिस उपनिरीक्षक सूर्यकांत उर्फ राजूभाऊ गुळभिले होय.

गेल्या अनेक वर्षापासून बीड शहराच्या मध्यवर्ती भागातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून सेवा करणारे पोलिस उपनिरीक्षक राजूभाऊ गुळभिले यांनी खाकीवर्दीतील दानवीराचे अनाथांची सेवेतून रूप दाखवले असून ते स्वतः दर महिन्याला पुरूष निराधारांची दाढी, कटिंग आरोग्य स्वच्छता स्वतः करतात तर निराधारांचे पाल्य बनून अनेक गरजू निराधारांवर अंत्यसंस्कार विधी त्यांनी केले आहेत. इतकेच नव्हे तर कुठल्याही सणासुद असो की पारिवारिक कार्यक्रम राजुभाऊ गुळभिले जिव्हाळा येथील निराधारांसोबत आनंदाने साजरे करतात तसेच आपल्या इतर सर्व मित्रांना, युवकांना प्ररित करतात. वाढदिवसाचा व्यर्थ खर्च न करता निराधारांना उपयोगी येणाऱ्या





वस्तू जिव्हाळा निराधार केंद्रात आणून द्याव्यात असे आवाहन करतात व त्यांच्या या कार्यामुळे जिल्हा भरात नव्हे तर महाराष्ट्रभर पोलीस खात्याची प्रतिमा उंचावली आहे. जिव्हाळा परिवारातील छोटी मुलगी लताशा या छोट्याशा बाळाची प्रकृती बरी नव्हती बाळाच्या आईकडे तिला दवाखान्यात घेवून जाण्यासाठी पैसे नव्हते जिव्हाळा केंद्राच्या जवळ असलेल्या दवाखान्यामध्ये डॉ. कोटेचा यांच्याकडे तपासणी करून घेण्याचे सांगून बाहेरून औषधी घेऊन दिले. पोलीस खात्यातील या दिलदार समाजसेवकांचे रूप पाहून त्या बाळाच्या आईचे डोळे भरून आले आणि त्या आईने पीएसआय राजुभाऊ गुळभिले यांचे मनापासून आभार मानले आणि त्यांच्या कार्याला भरभरून शुभेच्छा दिल्या.

शनिवार दि.०७ डिसेंबर रोजी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये अनाथांचे पांडुरंग, बेघरांसाठी सतत मदतीला धावून येणारे, जिव्हाळा परिवाराचे स्नेही पोलिस उपनिरीक्षक राजूभाऊ गुळभिले यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. त्यांना निरोगी आणि उदंड आयुष्य लाभो, त्यांचा येणारा काळ यश आणि आनंद घेऊन येवो. त्यांच्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्या अशी ईश्वराकडे मंगल कामना करण्यात आली.

श्री.राजू भाऊंचा वाढदिवस त्यांच्या सर्व मित्रमंडळींनी व्यर्थ खर्चाला फाटा देऊन येथे अनाथ, बेघर, ज्यांना कोणीही नाही अशा सर्वांना अन्नदान, उबदार रग, तसेच स्वेटर देवुन साजरा केला. या कार्यक्रमाला पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री अशोकजी मुदीराज सर, ड. विवेकानंदजी सानप, व्यापारी भारत झांबरे, राधिका ज्वेलर्सचे काळे सर, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, उत्तम ओव्हाळ, संदिप बेंद्रे, जालिंदर धांडे, अशोक रोमन शहरातील व्यापारी, पोलीस कर्मचारी आणि जिल्हा न्यायालयातील विधीज्ञ, कृष्णाजी काकडे, जिव्हाळा परिवाराचे श्री अभिजीत वैद्य सर, छाया सरोदे, यश वंजारे उपस्थित होते. जिव्हाळा परिवार, गुळभिले परिवार, विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी, मित्रमंडळींच्या वतीने त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

## परळी –सिरसाळा रस्त्यावर दोन आपघात: एकात एक जखमी तर दुसर्या अपघातात एक जागीच ठार

परळी (प्रतिनिधी)

परळी –सिरसाळा या एकाच रस्त्यावर काही अंतर व काही वेळेच्या फरकाने दोन वेगवेगळे आपघात घडले. एका आपघातात एक जण जखमी झाला तर दुसर्या एका अपघातात एक जागीच ठार झाला आहे.याबाबत मिळालेली माहिती अशी की, शुक्रावर दि. ६ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास तुकाराम मुंडलीक (सोनार), रा. खोकलेवाडी ता. गांगाखेड हे मोटार सायकलने जात असताना नाथरा पाटीजवळ त्यांच्या वाहनाला अपघात झाला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. ग्रामीण पोलीस व रुग्णवाहिकने तातडीने मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला.

दरम्यान याच वेळेच्या काही फरकाने सिरसाळा रस्त्यावरील रेवली फाट्यानजीक मोटार सायकलस्वार अपघातात जखमी झाला.ऋषी कुकडे रा.होळकर चौक धनगर गल्ली परळी वैजनाथ असे जखमीचे नाव आहे.परळी उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर त्यास स्वाराति रुग्णालय अंबाजोगाई येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# आव्हाने आणि आसही!

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ घेण्यासाठी महायुतीतील घटकपक्षांनी प्रचारकाळात खेळलेल्या खेळ्या लक्षात घेतल्या तरी संभाव्य श्रेयवाद किती उग्र राहू शकेल याची चुणूक दिसून येते

देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस' यांनी गुरुवारी अखेर आपला शब्द खरा करून दाखविला. राज्याचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून ते सत्तास्थानी आरुढ झाले आहेत. त्यांच्यासोबतच, एकनाथ गंगूबाई संभाजी शिंदे आणि अजित आशाताई अनंतराव पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा भव्य, देदीप्यमान सोहळा राज्याने अनुभवला.

या वलयांकित उत्सवामुळे यापूर्वीचे विलंबित सूर विरले असावेत असे 'सध्या'चे चित्र आहे. या समारंभाआधी अनेक गणिते जुळून आणावी लागली. या शपथविधीने काही राजकीय ताळेबंद बिघडण्याचीही शक्यता आहे. राजकारणात सर्वच गोष्टी त्वरेने होतात असे नाही. काही गोष्टींची चर्चा दीर्घकाळ होत राहते. दु:खी आत्म्यांचे असे रेंगाळते रवंथ आटोक्यात आणून अनेक आव्हानांचा सामना करीत राज्याचा 'महाविकास' घडविण्याचे कौशल्यकाम नव्या सरकारला करावे लागणार आहे.

मागच्या विधानसभेत बहुमताने निवडून आलेल्या सरकारमधील एक घटकपक्ष ऐन वेळी रुसला आणि त्याने वेगळी चूल मांडली. त्या घडामोडींनी देवेंद्र फडणवीस यांच्या राज्य नेतृत्वाचा घास पळविला होता. वरिष्ठांच्या निर्देशांनंतर त्यांना 'उप'नेतेपद स्वीकारावे लागले. नाराजीचे नाट्य या वेळीही झाले, मात्र एकनाथ शिंदे यांनी या अप्रसन्नतेचा प्रसार समर्थकांमधील रुष्टतेत परावर्तित होऊ नये, याची काळजी घेतली. यासाठी दोन वेळा माध्यमांपुढे येऊन खुलासा करण्याचे भान त्यांनी ठेवले. आजवर काहीसे ठाण्यापुरते केंद्रित झालेल्या एकनाथ शिंदे यांचा राजकीय परीघ मागील अडीच वर्षांत राज्यपातळीवर पोहोचला. ही राजकीय सक्षमता सिद्ध करताना त्यांनी 'साम-दाम-दंड-भेद' यापैकी कोणतेही मार्ग निषिद्ध ठेवले नाहीत. त्यांचे हे प्राबल्य आजवर कौतुकाचा विषय ठरले असले तरी, पुढील काळात काटेरी कंगोरे राज्याच्या नेतृत्वाला जाचक ठरणार नाहीत, याची काळजी भाजपला घ्यावी लागेल.

लोकप्रियतेचा जो परीघ शिंदे यांनी कमावला, त्याला उतरती कळा लागू नये, याचे प्रयत्न त्यांच्या पक्षाकडून आणि समर्थकांकडून नेटाने केले जातील. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ घेण्यासाठी महायुतीतील घटकपक्षांनी प्रचारकाळात खेळलेल्या खेळ्या लक्षात घेतल्या तरी संभाव्य श्रेयवाद किती उग्र राहू शकेल याची चुणूक दिसून येते. मुख्यमंत्री देवेंद्र यांच्यासोबत उपमुख्यमंत्रिपद स्वीकारताना अजित पवार हे उत्साहित होते. ते सहाव्यांदा उपमुख्यमंत्री झाले आहेत. ते आणि एकनाथ शिंदे हे सारख्या पदावर असले तरी त्यांची वृत्ती समान असेल हे समजण्याची गल्लत भाजपला करता येणार नाही. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी एक पाऊल मागे घेतले आहे. अजित पवार यांचा आटापिटा एक पाऊल पुढे जाण्यासाठी सुरू आहे. त्यामुळेच सत्तेतील त्रिदेवांचा ताळमेळ गरजेचा असणार आहे. विरोधकांचे सभागृहातील संख्याबळ कमी झाले असल्याने मतदारांपुढे जाऊन आंदोलने करण्याचे सातत्य त्यांना टिकवावे लागेल.

सोयाबीन, कापसापासून अन्य पिकांना योग्य हमीभाव न मिळाल्याने बळीराजा उद्विग्न असल्याचा अंदाज होता. येत्या काळात राज्यातील शेतकऱ्यांना संतुष्ट करण्याचे प्रयत्न नव्या सरकारला प्राधान्याने करावे लागणार आहेत. विरोधी पक्ष ईव्हीएमविरोधातील दबक्या आवाजातील चर्चेला जाहीर व्यासपीठांचे स्वरूप देण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याला प्रत्युत्तर देण्याचा व्यूह सत्ताधाऱ्यांना आखावा, रचावा लागेल. मराठा आंदोलनाने राज्याच्या राजकारणातील मोठा पेच अलीकडच्या काळात बघितला. मनोज जरांगे पाटील या नवनेतृत्वाने सर्वच पक्षांच्या नेत्यांना आपली दखल घेण्यास बाध्य केले. त्यांच्या आंदोलनाची भविष्यातील हाताळणी फडणवीस यांच्यासाठी तारेवरची कसरत असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाच ट्रिलिअन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य निर्धारित केले आहे. महाराष्ट्रातून एक ट्रिलिअन डॉलरची लक्षणीय भर घालण्याची हमी फडणवीस यांनी दिली आहे.

# वडवणी शहरातील आचारसंहितेमुळे महापुरुषांच्या चौकातील काढून टाकलेले ध्वज फडकविले

वडवणी ।प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकासह सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज नगरपंचायत प्रशासनाने व पोलिस बंदोबस्तात उतरविण्यात आलेले होते.आचारसंहिता संपून पंधरा दिवस होऊन गेले तरी प्रशासनाने ध्वज फडकविले नाही. तरी वडवणी शहरातील सामाजिक तरूणांनी एकत्र येऊन काल शनिवार रोजी सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज लावण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रशासनाने निवडणुकीची आदर्श आचारसंहितीचे पालन करण्यासाठी राजकीय पक्षांचे फलक यासह इतर नियम पाळण्यासाठी तालुका प्रशासनाने मोहीम सुरू केलेली यामध्ये आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने मोहीम सुरू केलेली आहे यामध्ये वडवणी शहरातील आचारसंहितेच्या कारणावरून नगरपंचायचे मुख्याधिकारी, कर्मचारी यांनी पोलिस बंदोबस्तात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, आण्णाभाऊ साठे, वसंतराव नाईक चौक , संभाजी महाराज चौक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, अहिल्यादेवी होळकर, संत सेवालाल महाराज चौक, संत सेना महाराज चौक यासह महापुरुषांच्या चौकातील ध्वज काढून टाकण्यात आले होते. याअगोदर प्रशासनाने झालेल्या निवडणुकीत महापुरुषांच्या चौकातील ध्वज काढून टाकण्यात आले नव्हते तरी घटनेचा सोशल मीडियातुन समाज बांधवांनी तिव्र संताप व्यक्त करून प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त केला होता.तरी या सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज काल शनिवार रोजी सामाजिक तरूणांनी एकत्र येऊन सन्मानाने लावण्यात आले आहेत. हे सामाजिक कार्य सतिश मस्के, अतुल मस्के, पत्रकार अविनाश मुजमुले, अमोल मस्के या चौघांनी मिळुन केले आहे. तरूणांनी राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. यावेळी डिसीसी बँकेंचे संचालक



अमोल आंधळे, युवराज शिंदे, मुन्ना मुंडे, शिवाजी तौर,ड. भास्कर उजगरे, अकबर भाई, सुरेश भोरे, सुग्रीव मुंडे, वकील संघाचे अध्यक्ष ड. तुकाराम आडे, पत्रकार विनायक जाधव, पत्रकार रामेश्वर गोंडे, प्रेमदास राठोड, शहाजी लोकरे, संभाजी दराडे, कृष्णा शिंदे, महादेव सावंत, बाळु आडे, प्रशांत डिगे, चक्रधर हेंद्रे, सुरज शिंदे, अनिल शिंदे, सह आदी उपस्थित होते.

# श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्यावतीने स्व.चंद्रकांत साळुंके यांच्या कुटूंबीयांना आर्थिक मदत

बीड ।प्रतिनिधी

गेल्या महिन्यात पत्रकार स्व.चंद्रकांत साळुंके आपले वर्तमानपत्राचे काम आटोपून सायंकाळच्यावेळी त्यांच्या नागापूर (बु.) या गावी मोटारसायकलवरुन जात असतांना त्यांचा अपघात झाला होता, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अशा अचानक जाण्याने कुटूंबावर मोठा दु:खाचा डोंगर कोसळला. स्व.चंद्रकांत साळुंके यांची घरची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने कुटूंबीयांना येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्यावतीने साळुंके कुटूंबीयांची भेट त्यांचे सांत्वन करुन आर्थिक मदत केली आहे.



साळुंके कुटूंबाची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट असून आई वडील-वृद्ध आहेत. स्व. चंद्रकांत साळुंके हे त्यांच्या आई-वडिलांना एकुलते एक होते. त्यांचा मुलगा लहान आहे. दोन मुली पैकीएक मुलगी उपवर आहे. शेती अत्यल्प आहे ती शेती आई-वडील करु शकत नाहीत. स्व.चंद्रकांत साळुंके यांच्या निधनाने हे कुटुंब अक्षरश: उघड्यावर पडले आहे. स्व.चंद्रकांत साळुंके यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबीयांना बीड येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने अर्थ सहाय्य म्हणून जी रक्कम जमा झाली ती २३ हजार रुपये त्यांचे चिरंजीव विनय यांना नागापूर येथे जाऊन देण्यात आली. यावेळी प्रा. लक्ष्मण गुंजाळ, मोहनराव गोरे, पी.आर. दुधाळ, निखिल शिंदे, नितीन राऊत, नागापूर येथील ज्येष्ठ नागरिक

# शालेय क्रीडा स्पर्धेबाबत सोमवारी बैठक

बीड ।प्रतिनिधी

जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा संघटनांची सोमवारी (ता.०९) दुपारी एक वा. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सबंधित खेळ संघटनांच्या प्रमुखांनी कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

आष्टे डू आखाडा, युनिफाईट, कुडो, स्पीडबॉल, टेंगसुडो, फिल्ड आर्चरी, सुपर सेव्हन क्रिकेट, बेल्ट रेसलिंग, टेनिस व्हॉलीबॉल, लगोरी, बीच व्हॉलीबॉल, टेनिस क्रिकेट, टेबल सॉकर, ग्रॅपलिंग, पॅन्टाक्यु, लंगडी, स्पोर्ट डान्स, संगीत खूर्ची, मॉन्टेक्स बॉल क्रिकेट, मिनी गोल्फ, फ्लोअर बॉल, थायबॉक्सिंग, हाफकिडो बॉक्सिंग, वुडबॉल, पॉवर लिफ्टिंग, टॉर्गेट बॉल, कॉर्फबॉल, ड्रॉपरो बॉल, चॉकबॉल, फुटबॉल टेनिस, वुडो, रोपस्किपींग, सिलंबम, थांग ता मार्शल आर्ट, कुराश, रस्सीखेच, जीत कुने दो, हुप क्वांन दो, युग मुन दो, वोवीनाम, जंप रोप, टेनिस बॉल क्रिकेट आदी खेळ संघटनांच्या प्रमुखांनी आवश्यक माहिती विहित वेळेत सादर केल्यानंतरच संबधित खेळाच्या जिल्हास्तर, विभागस्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन निश्चित करण्यात येणार आहे.


खेळाच्या अधिकृत राज्य संघटनेची जिल्हा संघटनेला मान्यता असल्याचे पत्र, धर्मादाय आयुक्त यांच्याकडील प्राप्त संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संघटनेच्या कार्यकारणीची यादी त्यांच्या पत्ता आणि संपर्क क्रमांकासह, खेळाबाबतची माहिती जसे खेळ सांघिक आहे, की वैयक्तिक, खेळाडू संख्या वजनगट, खेळाची नियमावली व इतर आवश्यक माहिती, जिल्हास्तर स्पर्धेचे आयोजन स्वबळावर (तांत्रिक आणि आर्थिक) करण्यास तयार असल्याचे हमीपत्र आदी कागदपत्रे खेळ संघटनांच्या प्रमुखांनी बैठकीस येताना सोबत आणावे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते आशिष सोने यांच्या मुलीचा विवाह संपन्न

## ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि धनंजय मुंडे यांनी दिल्या दूरध्वनीवरून शुभेच्छा सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील सामाजिक कार्यकर्ते तथा उत्कृष्ट शेतकरी आशिष भैया सोने यांच्या प्रथम कन्या चि.सौ.का प्रांजली आशिष सोने यांचा विवाह मुंबई येथील चि.शुभम संजय खत्री यांच्याशी दिनांक ४ डिसेंबर २०२४ रोजी जिल्ह्यातील सर्व सामाजिक,राजकीय, सांप्रदायिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सम्राट लॉन्स बीड येथे संपूर्ण झाला या विवाह सोहळयाला बीड जिल्ह्यातील सामाजिक,राजकीय



क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नो दाम्पत्यांना शुभ आशीर्वाद दिले तसेच या विवाह सोहळयाला मा.आमदार सुनील दादा धांडे हेही उपस्थित होते.तसेच नामदार धनंजय मुंडे साहेब यांनी व्हिडिओच्या माध्यमातून सोने आणि खत्री यांच्या विवाह सोहळयाला शुभेच्छा दिल्या.तसेच ज्येष्ठ नेते एकनाथ रावजी खडसे साहेब यांनीही दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.उपस्थित सर्व सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी नवदांपत्यांना शुभेच्छा देऊन नवजीवन साठी शुभआशीर्वाद दिले.सोहळ्याला उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे आशिष भैया सोने यांनी मनःपूर्वक स्वागत करून आभार मानले.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रांमधे श्री दत्त जयंती सप्ताह निमित्त श्रीगुरुचरित्र पारायणाची सर्वांना संधी

**बीड/प्रतिनिधी**

**प.पू.गुरुमाऊली, श्री. आण्णासाहेब मोरे, प्रमुख श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग दिंडोरी आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ अष्टसिद्ध महाशक्तीपीठ, त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक यांच्या आशिर्वादाने आणि आज्ञेने श्री दत्त जयंती अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताह दि. ०९ डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२४ या कालावधीत साजरा होत आहे.**

यावर्षीच्या सप्ताहात सर्व केंद्रांमधे श्रीगुरुचरित्र पारायण करण्यास परवानगी असल्याने दैनंदिन केंद्रांनी प्रहरे आणि यागांच्या सेवेसह श्रीगुरुचरित्र पारायण जास्तीत जास्त संख्येने करावे. साप्ताहीक केंद्रांमधे फक्त श्रीगुरुचरित्र पारायण वाचनास जास्तीत जास्त संख्येने सेवेकरी ग्रामिण आणि शहरातील सर्व भाविकांना पुरुष महिलांना या ग्रंथ पारायणास बसण्याचे महत्त्व सांगून या मार्गाचे सर्व नियमानुसार सर्व जनतेला या सेवेची संधी उपलब्ध करुनद्यावी, यासाठी सर्व जिल्हा तालुका प्रतिनीधी यांनी ही माहिती सर्वांना द्यावी या सप्ताहात अब्ज चंडी अंतर्गत इतर सर्व ग्रंथांचे जास्तीत जास्त पारायण सेवा वाचन करुन घ्याव्यात.श्री दत्त जयंती सप्ताह हा पर्वणी काळ असून यामध्ये सामुहिक होणाऱ्या श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायणाच्या देवी शक्तीने व्यक्तीच्या जीवनात आणि घरात सुखशांती, समाधान मिळत असल्याने लाखो भाविक या सप्ताहामधील सर्व सेवेमध्ये



सहभागी होवून आपल्या जीवनाचे कल्याण करुन घेतात. या ग्रंथ पारायणामुळे कुटुंबाचे पितृदोष आणि वास्तुदोष कमी होवून शापित, बाधित दुःखी असणाऱ्यांना चांगल्या अनुभूती तात्काळ येतात.म्हणून कुटूंबातील सर्वांनी किंवा किमान एका व्यक्तीने (स्त्रियांनी अथवा पुरुषांनी तसेच मुला मुलींनी) या सप्ताहकालावधीत श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायणास कोणतीही शंका न घेता सहभागी व्हावे. या सप्ताहामध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकाने सामुहिक श्री स्वामी चरित्र आणि श्री दुर्गासप्तशती (मराठी) या ग्रंथाचे पारायणामध्ये सहभागी होवून तसेच श्री स्वामी समर्थ, श्री नवार्णव, श्री गायत्री आणि श्री महामृत्युंजय या सर्व मंत्रांचा जास्तीत जास्त जप सप्ताह कालावधीत करावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून...

### विधानसभा निवडणुकीच्या..

आचारसंहितेपूर्वी २ हजार विविध अध्यादेश शासनाने जारी केले त्यात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ही अध्यादेश जारी करण्यात आला. परंतु त्यात १ हजार ६५ कोटींचीच मदत देण्याचा निर्णय झाला. उर्वरित २ हजार ६९९ कोटी रुपयांच्या मदतीचा आदेश आचारसंहितेत अडकला. परिणामी शेतकऱ्यांना पूर्णतः मदत मिळू शकली नाही. ऑक्टोबर मध्ये दिवसाकाठी दोन शेतकरी आत्महत्या सत्र झाल्याचे दिसून येते. दुष्काळग्रस्त मराठवाडा, सिंचन अनुशेष, नापिकी, सततचा दुष्काळ, कापूस व सोयाबीनला भाव नसणे, नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, ओला दुष्काळ, गारपीट, दुधाचे दर मागेपुढे होणे, शेतीमध्ये शाश्वतता नसणे यासारख्या अनेक कारणांमुळे मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. बीड, नांदेड नंतर छत्रपती संभाजी नगर व धाराशिव जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचा आकडा मोठा आहे. ही बाब मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी व खेदाची बाब आहे. महाराष्ट्र राज्यात आता मराठवाड्याची ओळख ही दुष्काळग्रस्त, टँकर वाडा तसेच दुष्काळग्रस्त मराठवाडा म्हणून झालेली आहे. मागच्या तीन महिन्यात मराठवाड्यात १८० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.मायबाप राज्य सरकारने याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नये या दृष्टीने राज्य सरकारने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. तसेच मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष दूर करणे गरजेचे आहे. अन्यथा मराठवाड्याचा वाळवंट व्हायला आता वेळ लागणार नाही. अशी खंत यावेळी सिंचन अभ्यासक मराठवाडा पाणी प्रश्न नितीन पाटील खोडेगावकर यांनी व्यक्त केली आहे.

# पाच वर्षांच्या वियानाला सोबत नेत आ.नमिता मुंदडा यांनी घेतली आमदारकीची शपथ

## सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त केल्या आईच्या भावना



केज/प्रतिनिधी

पाच वर्षांपूर्वीची ती सकाळ अजूनही माझ्या मनात कोरलेली आहे. गर्भवती अवस्थेत,ह्रदयात असंख्य स्वप्नं,भीती आणि अनेक जबाबदाऱ्या घेऊन मी पहिल्यांदा विधिमंडळा च्या दाराशी उभी होते. माझ्या पोटात वाढत असलेल्या छोट्या जीवाने मला त्या क्षणाला आधार दिला,जणू तिच्या स्पंदना तून ती म्हणतहोती,आई, तू हे करू शकतेस !अशा भावना सोशलमीडियाच्या माध्यमातून मांडत केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी एका आईच्या भावनांना वाट मोकळी करून दिली.केज विधानसभेत विजय मिळवल्यानंतरआ.नमिता मुंदडा या आमदारकीची शपथ घेण्यासाठी विधान भवनाकडे निघाल्या त्या आपली लेक वियानाला घेऊन चेहऱ्यावरसमाधान व सोबत असलेल्या चिमुकलीचा अभिमान घेऊन शपथविधीनंतर त्यांनी सोशल मीडियावर व्यक्त होत व्यक्त केलेल्या भावना प्रत्येक आईला अभिमानाची आसवे डोळ्यात आणणारी आहेत.आज पाच वर्षां नंतर तीच माझीचिमुकली कन्या वियाना आता पाच वर्षांची झाली आहे.तिच्या छोट्या हातात हात धरून पाच वर्षानंतर पुन्हाएकदा मी शपथविधिच्या निमित्ताने विधिमंडळाच्या दारात उभी आहे.हा क्षण माझ्यासाठी एक आमदार म्हणूनच नव्हे तरएकआई म्हणून खूप आनंददायी आहे.तिच्या डोळ्यांत माझ्याबद्दलचा अभिमान पाहून माझं हृदय भरून आलंय.तिच्या लहानशा हातांनी माझं बोट घट्ट धरलेलं पाहून वाटतंय संघर्षाचा प्रत्येक क्षण, त्यागाचं प्रत्येक पाऊल सार्थ ठरले असल्याच्या एका आईच्या भावना आ. नमिता मुंदडा यांनी व्यक्त केल्या आहेत.

# तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला केल्या प्रकरणी पोखरी येथील तिघांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

जुन्या वादावर बोलून समझोता करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तिघा भावांनी तलवार, लाठ्या-काठ्यांनी प्राणघातक हल्ला चढविला. याप्रकरणी तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.

विनोद वसंत ढवारे (वय ३०, रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. विनोदच्या फिर्यादीनुसार त्याच्या गावातील सुरज संतोष वाघमारे याने विनोदचे भाऊ महादेव, शंभू आणि आकाश यांच्या विरोधात अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली होती. सदर वाद चर्चेतून सामोपचाराने मिटविण्यासाठी विनोद, विलास कुराडे, विनोद बलवंत आणि भाऊ आकाश हे बुधवारी (दि.०४) रात्री ८ वाजता सुरज वाघमारे याच्या घराकडे गेले. त्या ठिकाणी वाद मिटविण्याबाबत चर्चा सुरु असताना सुरज घरात गेला आणि लोखंडी तलवार आणून त्याने विनोदवर वार केला. तर त्याचे भाऊ संतोष आणि शिवम यांनी विनोदला लाकडी दांड्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी विनोद सोबत आलेल्या ग्रामस्थांनी त्याला हल्लेखोरांच्या तावडीतून वाचविले आणि उपचारासाठी स्वाराती रुग्णालयात दाखल केले. सदर फिर्यादीवरून सुरज संतोष वाघमारे, मनोज संतोष वाघमारे आणि शिवम संतोष वाघमारे या तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. गुन्हा दाखल होताच सुरज वाघमारे यास पोलिसांनी अटक केली असून उर्वरित दोघे फरार आहेत. पुढील तपास एपीआय रंगनाथ जगताप करत आहेत.

## शिवसेना केज तालुका प्रमुखपदी पृथ्वीराज पाटील

# एकनाथ शिंदे साहेबांनी तरुणांना संधी दिली - सचिन मुळूक

बीड ।प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांच्या आदेशाने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेना केज तालुका प्रमुख पदी पृथ्वीराज पाटील यांचे निवड झाली. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केजमध्ये तरुणाला संधी दिली असून केज तालुक्यात पाटील यांचा दांडगा जनसंपर्क आहे. यामुळे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पाटील यांचा शिवसेनेला नक्कीच फायदा होईल असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला.शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर केज तालुका शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक



शनिवारी (दि.७) पार पडली. या बैठकीत पृथ्वीराज पाटील यांची शिवसेना केज तालुका प्रमुखपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, केज तालुक्यातील विविध सामाजिक कार्यक्रमात पृथ्वीराज पाटील यांचा सक्रीय सहभाग आहे. यामुळे पाटील कुटुंबीय संपुर्ण बीड जिल्ह्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रात परिचित आहे. केज तालुक्यात व केज मतदारसंघात पाटील कुटुंबाचा दांडगा जनसंपर्क असून आगामी पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पृथ्वीराज सुरेशराव पाटील यांची नियुक्ती शिवसेनेसाठी फायदेशीर ठरणार आहे असे सचिन मुळूक म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनीही पृथ्वीराज पाटील यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित शिवसेनेचे जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे , युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, शहर प्रमुख बालासाहेब पवार , तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे , उपतालुकाप्रमुख चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, ज्येष्ठ शिवसैनिक डॉ. संतोष बुडुक, युवा सेना शहरप्रमुख आकाश चाळक तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमित देशमुख यांचा मातंग समाजातर्फे सत्कार

लातूर ।प्रतिनिधी

**लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून सलग चवथ्यांदा विजयी झाल्याबद्दल माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचा बाभळगाव निवासस्थानी मातंग समाजच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य माधव गादेकर, पत्रकार अशोक देडे, आनंद वैरागे, माजी नगरसेवक सुनील बसपुरे, राज क्षिरसागर, मोहन सुरवसे, डॉ. दिनेश नवगिरे, श्रीमंत गायकवाड, ऍड अंगद गायकवाड, माजी नगरसेविका केशरबाई महापुरे, सुरेश चव्हाण, अंगद वाघमारे, कल्याण शाहीर, नागनाथ डोंगरे, महेंद्र घोडके आदिसह मातंग समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



याप्रसंगी अमित देशमुख यांनी शहरासह जिल्हाभरातील मातंग समाजाचे प्रश्न जाणून घेऊन ते सोडवण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे बजेट वाढवून घेण्यासाठी आणि आरक्षणाचा अ ब क ड प्रवर्ग लागू होण्यासाठी प्रत्यनशील राहू, अशी ग्वाही दिली. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन रवींद्र काळे, धाराशिव जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अश्लेष मोरे आदी उपस्थित होते.

# माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने अनाथ, वृध्दांना उबदार ब्लँकेटचे वाटप

बीड ।प्रतिनिधी

माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने मागील काही दशकापासून विविध सामाजिक, धार्मिक आर्थिक, शैक्षणिक उपक्रम अविरत राबवीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून शहरात अनेक असहाय्य लोक, वृध्द व्यक्ती थंडीने हुडहुडत असल्याने माहेश्वरी प्रगती मंडळाच्या सर्व सदस्यांनी शहरातील अशा व्यक्तींना उबदार ब्लँकेट देण्याचा निर्णय घेऊन शहरातील शनी मंदिर, बीड बस स्थानक, शासकीय रुग्णालय, भाजी मंडई परिसर, कंकालेश्वर मंदिर परिसर, खंडेश्वरी दीपमाळ, सुभाष रोड, यशवंत उद्यान, स्वामी समर्थ मंदिर परिसरासह शहरातील प्रमुख भागातील गरजूवंतांना माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने प्रत्येक सदस्यांनी जावुन जवळपास १२५ ब्लँकेटचे वितरण केले तसेच समाजातील अनेक गरजू परिवार व स्नेह सावली परिवार, वृध्दाश्रम, रामनगर येथील निराधारांना ब्लँकेटचे वितरण केले याबरोबरच नवीन भाजी मंडई परिसरात श्री राजू वंजारे चालवीत



असलेल्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे मंडळातील सदस्यांनी चार वेळेच्या अन्नदानाची सेवा दिली. याप्रसंगी माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, उपाध्यक्ष संतोष टवानी, महामंत्री जुगलकिशोर बियाणी, कोषाध्यक्ष जगदीश सिकची, संघटन मंत्री विष्णुदास बियाणी सहसचिव राजेंद्र चरखा, प्रकल्प सभापती रमन बाहेती, सि.ए.गोपाल कासट, प्रदीप चितलांगे, सुरज लाहोटी, डॉ.राजेंद्र सारडा, भागीरथ चरखा, बालकिसन बियाणी, इंजिनिअर दगडूलाल बंग, ईश्वर चरखा, कैलास कलंत्री, ॅड. विजयकुमार कासट, विष्णुदास तापडिया, बीड तहसील माहेश्वरी सभेचे पंकज भुतडा, राम मानधने, कासट, महेश काका, गिरीश सोहनी, पंकज धुत, रांदड आदींसह सदस्यांनी ब्लैंकेट वितरित करण्यास सहकार्य केले.

# लोकनेते जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त एस.के.एच महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबीर

बीड ।प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव लोकनेते माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय द्वारा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिराचे घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन लोकनेते जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक गिरीष देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाचे सल्लागार तथा काकू- नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, सुनील पांगारकर,



सुभाष क्षीरसागर, सतिश राठौर, प्रकाश राठोड, परमेश्वर धारकर, श्रीराम कुर्हे, जयश्री विधाते, उपप्रचार्य डॉ.गणेश पांगारकर, विलास विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती.काकू नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानवी जीवनात रक्तदानाचे अनन्य साधारण महत्त्व असून माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने प्रचंड यश संपादन केलेले असले, तरीही अद्याप कृत्रिम रक्त तयार करण्यास यश आलेले नाही त्यामुळे मानवी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानानंतर काही तासांतच शरीरास आवश्यक रक्त निर्मिती होऊन योग्य रक्त पातळी तयार होते.शहरातील विविध रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा मोठा तुटवडा असून रुग्णाबरोबरच त्यांच्या नातेवाईकांना देखील गंभीर समस्येला तोंड द्यावे लागते.सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय दरवर्षीप्रमाणे यावर्षीही लोकनेते जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य सातत्याने करत आले आहे. यावेळी एच एम एम विभागाचे प्रा.डॉ.शेख नासेर, डॉ.वैभव शहापुरे, डॉ.अशोक शिंदे, ग्रंथपाल डॉ.गणेश खेमाडे, सहाय्यक ग्रंथपाल सौ.उषा राऊत, राणी रणखांबे यांचे सह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे दादा कुंबकर, गौतम मैरठ, आर.एस.खेडकर, नितीन सोळंके, बालाजी घुले, अक्षय घुले, मयुरेश गायकवाड यांनी रक्त संकलन केले.शिबिराच्या यशस्वीतेसाठी आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा.राजा मचाले, डॉ.विवेक दुसाने, उमेश वाघमारे, ज्योतिबा काळे, दत्ता आघाव यांनी परिश्रम घेतले. यावेळी फार्मसी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. अंजली पवार, डॉ.मीना हंगे, डॉ.सोनल बाहेती, डॉ. मीना भस्मे, डॉ.अंजली क्षीरसागर,डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ.सुरेश तोष्णीवाल, डॉ.शेख जाफर, डॉ.ज्ञानेश्वर जोशी, डॉ.राजेश कुलकर्णी

## आनंदऋषिजी हॉस्पिटल बीड येथे

# महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलेसिस सेवा उपलब्ध

बीड ।प्रतिनिधी

संत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल

बीड येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत उपलब्ध आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना डायलेसिस सेवा मोफत उपलब्ध.डायलेसिस असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे. चॅरिटेबल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट असल्याने आम्ही अतिशय वाजवी शुल्कासह डायलिसिस सेवा देतो. बहुतेक रुग्णांना सवलत किंवा मोफत डायलिसिस उपचाराची सुविधा देखील दिली जाते.हे देखील आढळून आले की ४०-६० मूत्रपिंड निकामी रुग्ण एचआयव्ही आणि हिपॅटायटीसने ग्रस्त आहेत, ज्यासाठी इतर मूत्रपिंड-निकामी रुग्णांना संसर्ग होऊ नये म्हणून आमच्याकडे स्वतंत्र / स्वतंत्र डायलिसिस मशीन आहे.संत आनंदऋषीजी

महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील डायलेसिस रुग्णांना बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.



बीड ।प्रतिनिधी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ भदंत आनंद कौसल्यायन नगर मौजे शीवणी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना असंख्य उपासक, उपासिकांच्या उपस्तिथीत अभिवादन करण्यात आले. यावेळी उपासक आयु.अंकुश नाना डोळस,आयु.इंजि.वसंतराव तरकसे, रमेश कोरडे, विद्यागर बप्पा, भास्कर सरपते, कविता डोळस, रुतुजा डोळस, करिष्मा वक्ते, रतन वक्ते, जयाताई डोळस, मुद्रकाताई डोळस, मनिषा प्रकाश डोळस, रोशनी डोळस, मौजे शीवणी आणि परिसरातील अनेक ऊपासक आणि ऊपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.**

## दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रहण सुटेना

# एकच वैद्यकीय अधिकारी असल्याने रुग्णांची हेळसांड ; वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणी कमी होण्याचे चिन्ह दिसेनात.दासखेडचे भुमिपुत्र आणि मुख्यमंत्र्यांचे तत्कालीन ओएसडी कृष्णा जाधव यांच्या पाठपुराव्यातुन तब्बल २ कोटी ६३ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व सुविधांनी सुसज्ज ईमारत पुढा-याच्या श्रेयवादात उद्घाटनाच्या प्रतीक्षेत २ वर्षांपासून धुळखात पडुन होती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.सरीता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांना लेखी तक्रार केल्यानंतर त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना उद्घाटनाची प्रतिक्षा न करता प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.त्यानंतर



डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासून दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा सुरू झाली. त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ.पुजा माने आणि डॉ.शरयु पडोळे यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र गेल्या ४ महिन्यांपासून केवळ डॉ.शरयु पडोळे याच आरोग्य सेवा देत असुन डॉ.पुजा माने या ४ महिन्यांपासून अद्याप रूजु झाल्याच नाहीत. सध्या कडाक्याच्या थंडीमुळे सर्दी, घसादुखी, श्वसन विकारांच्या रुग्णांत वाढ झाली असुन लहान मुलांसह वृद्ध नागरीक व महिला व पुरुष यांची भर पडली असुन एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांवर प्राथमिक आरोग्य केंद्राची मदार असल्याने रूग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असुन तातडीने त्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य आधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात ४ शिपाई,१ आरोग्य सेवक,१ औषधी निर्माता,१ कनिष्ठ लिपिक,१ लॅब टेक्निशियन , मुख्यमंत्री लाडका भाऊ योजनेंतर्गत १ महिला आरोग्य सहाय्यक यांची पदभरती करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ५०-६० रूग्ण तपासणीसाठी येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणाऱ्या एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर याचा शारीरिक व मानसिक ताण पडत आहे. तसेच काही कामानिमित्त रजा घेतली तर मात्र रूग्णांची अडचण निर्माण होऊन त्यांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करत पाटोदा येथील रूग्णालयात जावे लागते.रूजू न झालेल्या डॉ. पुजा माने यांना अनाधिकृत गैरहजर प्रकरणी नोटीस पाठवली आहे ; वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी उपसंचालक आरोग्य सेवा यांना पत्रव्यवहार केला आहे :- डॉ.उल्हास गंडाळ ; जिल्हा आरोग्य अधिकारी बीड

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती देण्यात आलेल्या डॉ.पुजा माने यांना दि.०७ मार्च पासुन कोणताही रजेचा अर्ज कार्यालयास सादर न करता अनाधिकृत रित्या गैरहजर राहिल्याने सेवा समाप्तीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल व शिस्त भंग विषयक कारवाई करण्यात येईल अशी नोटीस बजावुन उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडळ लातुर यांना कळविण्यात आले असुन लवकरच वरीष्ठांच्या आदेशाने प्राथमिक आरोग्य केंद्रात दुसऱ्या वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल



# जयदत्तजी आण्णा आदर्श राजकारणी - डॉ. स्नेहल पवळ

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते जयदत्तजी आण्णा क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांच्या संकल्पनेतून स्त्री-शक्ती प्रतिष्ठान बीड द्वारा सुप्रसिद्ध डॉ. स्नेहल अक्षय पवळ यांचे दात केस त्वचा या विषयी मोफत प्राथमिक तपासणी आणि मार्गदर्शक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. स्नेहल पवळ यांनी आज आपण आण्णांच्या वाढदिवसानिमित्त या मोफत शिबीराच आयोजन केल असुन आण्णासाहेब हे एक आदर्श राजकारणी असुन शांत संयमी उच्च विद्याविभूषित नेतृत्वाने आपल्या राजकीय कारकीर्दीत ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण केले. तेंव्हा वैद्यकीय क्षेत्रातही केवळ व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता ऐंशी टक्के व्यावसायिक आणि वीस टक्के सामाजिक दायित्व जपल पाहिजे. आपण हि एलीट ॲडव्हान्स डेंटल ण्ड कॉस्मेटीक सेंटर मधून दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी बीड शहरातील अंगणवाडीतील मुलांची मोफत दंत तपासणी करुत. आणि नवीन वर्षाच्या जानेवारी महिन्यात संक्रांत भेट म्हणून महिलांना स्किन ट्रिटमेंट मध्ये विशेष सुट देऊत असे सांगीतले.


या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून समाजसेविका वर्षाताई केंडे, संजीवनीताई पोकळे, निशाताई पवळ, प्रा. संगीताताई शिंदे,आरोग्य मार्गदर्शक राणीताई सानप ललीताताई भोसले यांची उपस्थिती लाभली होती.तर या तपासणी शिबिराचा परिसरातील बहुसंख्य महिला मुलींनी लाभ घेतला.

# शिवसेना एकनाथराव शिंदे पक्षाच्या केज तालुकाप्रमुख पदी श्री. पृथ्वीराज सुरेश पाटील यांची निवड



केज/प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना.एकनाथ रावजी शिंदे,संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांच्या आदेशाने जिल्हाप्रमुख सचिन भैया मुळूक,जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना केज तालुकाप्रमुख पदी पृथ्वीराज सुरेशरावपाटील यांची निवड झाली आहे. यावेळी उपस्थित शिवसेने चे जिल्हा संघटक योगेश नवले,शिवसेना केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे,युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते,केज शहरप्रमुख बालासाहेब पवार,तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे,उप तालुकाप्रमुख चंद्रकांत इंगळे,ज्येष्ठ शिवसैनिक डॉ.संतोष बुडुख,विभागप्रमुख दत्ता काकडे,युवासेना शहर प्रमुख आकाश चाळक शिवसेना पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. सर्वांनी त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



दि.०६ डिसेंबर २०२४ रोजी महापरिनिर्वाण दिन साजरा करताना केज येथे भीमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर,युवा नेते लखन हजारे, अल्लाउद्दीन शेख,गोटू मस्के,शिवमुर्ती हजारे व इतर उपस्थित होते.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात खंडेश्वर यात्रेनिमित्त ग्रंथप्रदर्शना सह विविध सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वतनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज.जि.बीड येथे खंडेश्वर यात्रेनिमित्त दिनांक ०७ डिसेंबर २०२४ रोजी ग्रंथप्रदर्शन,ग्रंथवाचन, उत्स्फुर्तभाषण,गीतगायनअभंग,गौळणी सादरी करण आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक,सुप्रसिद्ध वक्ते व व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.



सर्व कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प.नारायण भाऊ गायकवाड,माजी सरपंच रामराजे गायकवाड,बन्सी नाना गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.ग्रंथ प्रदर्शनाला जेष्ठ नागरीक, युवक यांच्या उपस्थिती लक्षणीय होती.गौळणीचे सादरीकरण ह.भ.प. नारायण भाऊ गायकवाड यांनी केले तर अभंगाचे सादरीकरण माजी सरपंच रामराजे गायकवाड यांनी केले.ग्रंथवाचन पापा टिंगरे,ज्ञानेश्वर गायकवाड, शहाजी गवारे,भगीरथ भोसले यांनी केले.

गीतगायन सौरभ पवार, अजीत खाडे,दासराव जोगदंड यांनी केले.उत्स्फुर्त भाषण सेवा निवृत्त मुख्याध्यापक छगन नाना गायकवाड, रामकृष्ण तात्या गायकवाड,अजीत खाडे, सौरभ पवार,बाळासाहेब गायकवाड,काशीनाथ भोसले,एस.बी.पवारयांनी केले.कार्यक्रमाला अरुण गायकवाड,बन्सी नाना गायकवाड,शिवदास गायकवाड,योगीराज कोठावळे,शहाजी गवारे, गोविंद गायकवाड (एम. आय.टी,पुणे),रावसाहेब जाधव यांच्यासह मोठया संख्येने वाचक,हित चिंतक,श्रोते उपस्थित होते.सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून लागलेला डाग पुसण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांना मंत्री करा- जितेंद्रराजे भोसले

पाटोदा। प्रतिनिधी

विधान सभेच्या निवडणुकीत भाजप महायुतीने मोठे यश मिळविले आहे. यामध्ये आष्टी, पाटोदा, शिरुर विधानसभा मतदार संघातुन माजी मंत्री सुरेश धस यांनी ७८ हजाराच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला आहे. आ. सुरेश धस यांनी यापूर्वी तीन वेळा विधानसभेचे नेतृत्व केलेले आहे. एक वेळा बीड- लातुर-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेचे आमदार म्हणुन काम केलेले आहे. त्यांच्याजवळ आमदारकीच्या चार टर्मचा दांडगा अनुभव आहे. त्यांचा जनसंपर्क सुद्धा खूप मोठा आहे. लोकशाही आघाडी सरकारच्या काळात त्यांनी महसूल व पुनर्वसनसह अनेक. खात्याचे राज्य मंत्रीपदसुद्धा भूषविले आहे. आ. सुरेश धस यांनी मंत्रिपदाच्या काळात अतिशय उत्तम असे काम केलेले आहे.



याच दरम्यान उत्तराखंडमध्ये आलेली पर परिस्थिती असो की, आष्टी मतदार संघात पडलेला दुष्काळ असो आ. सुरेश धस यांनी आपल्या कौशल्याचा वापर करून ही परिस्थिती उत्तमपणे हाताळलेल्या होती. मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांचे प्रश्न असो की, पाणी प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला प्रश्नसुद्धा आ. सुरेश धस यांनी वेळोवेळी पोटतिडकेने सभागृहात मांडलेला आहे. विशेष म्हणजे कोरोना महामारीच्या काळातसुद्धा महाराष्ट्रात सर्वात जास्त कोविड सेंटर आ. सुरेश धस यांनी चालविले आणि त्यातून हजारो लोकांना या महाभयंकर संकटातून वाचविले होते.यामुळे पक्षश्रेष्ठींनी आमदार सुरेश आण्णा धस यांना कॅबिनेट मंत्री करावे अशी मागणी युवा नेते जितेंद्रराजे भोसले यांनी केली आहे



# शासनाने शपथपत्रासाठी ५०० रुपयांची स्टम्प ड्यूटी बंद करून पूर्वी प्रमाणे १०० रुपयाचीच स्टॅम्प ड्यूटी चालू ठेवावी भीमशक्ती संघटनेची मागणी

केज/प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजने साठी नागरिकांनास्टॅम्पवर शपथपत्र द्यावे लागतआहे पूर्वी १०० रुपयाच्यास्टॅम्प वर शपथपत्र द्यावे लागत होते परंतु शासनाने १०० रुपयाचा स्टॅम्प बंद केला आहे.आता ५०० रुपया च्या स्टॅम्पवर शपथपत्र द्यावे लागत आहे.एक शपथपत्र देण्या साठी लागणारा खर्च ५१० रुपयाचा स्टॅम्प,टाइपिंग साठी ६० रुपये नोटरी १०० रुपये एकूण सर्व ६७० रुपये लागत आहे सदर खर्च हा सर्वसामान्य नागरिकांना परवडणारा नाही यावरून असे दिसून येते की,शासनाकडुन सर्रासपणे नागरिकांची लूट होत आहे.विद्यार्थ्यां साठी शैक्षणिक कामा साठी साध्या कागदावर शपथपत्र देण्यात यावे. तरी तहसीलदार साहेब, केज यांनी सर्व बाबीचा विचार करून तात्काळ पूर्वीप्रमाणे १०० रुपये स्टॅम्पवर शपथपत्र चालू करण्यात यावी.तसेच शपथपत्रासाठी ५०० रुपयाच्या स्टम्पची अट रद्द करण्यात यावी जर सदर प्रकरणी ती अट शिथिल करण्याची शासनाने लवकरात लवकर दखल नघेतल्यास भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीनेआमरण उपोषण करण्यात येईल असा ईशारा भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर व पदाधिकारी यांनी तहसीलदार यांनादिलेल्या निवेदनात ईशारा दिला आहे.

# विनयभंगाचा खोटा गुन्हा हा केवळ खंडणीच्या उद्देशानेच - डॉ. बालाजी फड

## परळीत डॉक्टरांना बदनाम करण्याचे षडयंत्र-डॉ.फड

परळी / प्रतीनिधी

माझ्यावर दाखल करण्यात आलेला विनयभंगाचा गुन्हा हा केवळ खंडणीच्या उद्देशानेच दाखल करण्यात आलेला आहे. तो पूर्णपणे खोटा आहे. याबाबत पोलिसांना आठ दिवसापूर्वी मी लेखी तक्रार दिल्यानंतरही माझ्यावर गुन्हा दाखल झाला असे मत परळी येथील बालरोग तज्ञ डॉ. बालाजी फड यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. तसेच परळीतील डॉक्टरांना बदनाम करण्याचे षडयंत्र केले जात असल्याचेही ते म्हणाले.

याबाबत पत्रकारांशी बोलताना डॉ. बालाजी फड पुढे म्हणाले की, माझ्यावर गुन्हा दाखल करणा-या महिलेच्या विरोधात मी दिनांक २७ नोव्हेंबर रोजी तक्रार दिली होती. यामध्ये मला पैशाची मागणी करण्यात येत असून विनाकारण त्रास देण्यात येत आहे असे नमूद केले होते. संभाजीनगर पोलिसांनी त्यावेळी गुन्हा दाखल केला नाही. परंतु २ डिसेंबर रोजी माझ्या रुग्णालयात येऊन माझ्यासह पत्नी व माझ्या कर्मचाऱ्यास मारहाण केली व आमच्यावरच विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केला. आणि पोलिसांनी कोणतीही शहानिशा न करता गुन्हा दाखलही केला. या




महिलेने विनययभंग व मारहाणीचा जो गुन्हा दाखल केला तो गुन्हा माझ्या डॉक्टरी पेशाची बदनामी करून माझ्याकडून खंडणी वसूल करण्यासाठीच दाखल केला असून सदरील महिला प्रचंड फ्रॉड असून या महिलेकडे दोन बनावट आधारकार्ड असल्याचे ते म्हणाले.

मी मागील सुमारे १८ वर्षापासून वैद्यकीय क्षेत्रात प्रामाणिकपणे सेवा देत आहे. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या व्यक्तीला बदनाम करण्याचे काम केले जाते आहे. हे षडयंत्र परळीतील समाजाने हाणून पाडले पाहिजे व सत्य ओळखून या प्रवृत्तीना वेळीच पोलिस प्रशासनाने पायबंद केले पाहिजे असेही पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. बालाजी फड़ यानी सांगितले.



मस्साजोग ।प्रतिनिधी

घरातील आठराविश्व दारीद्रय असताना प्रतिकूल परिस्थितीवर मात करून लातूर येथील रहिवासी असलेले सिध्दार्थ किशोर बांगे यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत यश संपादन करून आयपीएस पदी निवड झाल्याबद्दल पत्रकार अनंत जाधव , अजय देशमुख,किरण जानकर ,ऋषिकेश कदम , ऋषिकेश सानप,रितीक अवतारे यांच्या हस्ते दिनांक ५ डिसेंबर गुरुवार रोजी सावित्रीबाई फूले पुणे विद्यापीठातील संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाच्या प्रांगणात शालश्रीफळ व मराठवाडा मित्र मंडळ पुणे शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांचे आधारवड गौरव ग्रंथ व वरिष्ठ आयपीएस अधिकारी अमिताभ गुप्ता यांचे कॅपी टेबल बुक देऊन सत्कार करण्यात आला .पुढील प्रशिक्षण कार्यकाळासाठी बांगे यांना शुभेच्छा दिल्या.

# ऊर्जा फाउंडेशन व राजमुद्रा अकादमीचा शैक्षणिक उपक्रम

## गरजू विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षण मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

**मुंबई ।प्रतिनिधी**

**ऊर्जा फाउंडेशनच्या सहकार्यातून राजमुद्रा अकादमीचे संचालक मनोहर भोळे आणि फ्युचर अकादमीचे संचालक डॉ. विजय जंगम (स्वामी) यांच्या वतीने रविवार, ८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता गरज् विद्यार्थांसाठी स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षण मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा नेब वर्कशॉप फॉर द ब्लाइंड,सस्मिरा इन्स्टिट्यूट, सस्मीरा मार्ग, वरली, मुंबई येथे होणार आहे.**

सह्य शिवालय जंगम समाज आणि मुंबई विभागातील सर्व गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत एम पी एस सी यू पी एस सी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होणार आहे. यात विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी आणि त्यावरील शिक्षण घेतलेले असावे अशा सूचना देण्यात आल्या असून सर्व समाजातील गरजू पदवीधर विद्यार्थ्यांचे या स्पर्धा परीक्षासाठी स्वागत करण्यात येणार असल्याचे आयोजक डॉ विजय जंगम स्वामी यांनी सांगितले.

फ्यूचर अकादमी आणि राजमुद्रा अकादमी यांनी या कार्यशाळेसाठी सहकार्य केले असून या मार्गदर्शन शिबिरात डॉ विजय जंगम स्वामी, मनोहर भोळे सर तसेच आयएएस, आयपीएस अधिकारी यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या संदर्भात अधिक माहिती करिता ८३६९८७६०३६ ह्या हेल्प लाईन नंबर संपर्क साधावा असे आवाहन ऊर्जा फाउंडेशन च्या समन्वयक रोहिणी जंगम यांनी केले आहे.




# लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महा परिनिर्वाण दिन संपन्न

केज/प्रतिनिधी

केज शहरापासुन जवळच बीड रोडवर असलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज मध्ये शुक्रवारी सकाळी विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करुन त्यांचा ६८ वा महा परिनिर्वाण दिन संपन्न झाला.यावेळी प्राचार्य रवि पवार,शिक्षक,कर्मचारी आणि विद्यार्थिनी,विद्यार्थी उपस्थित होते.केज शहरा पासुन जवळच असलेल्या बीड रोडवरील सिध्दी विनायक शैक्षणिक सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे यांनी सुरु केलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महा परिनिर्वाण दिनानिमीत्त दि.६ डिसेंबर शुक्रवार रोजी सकाळी लक्ष्मी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य रवि पवार सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे महत्व सरांनी उपस्थितांना सांगीतले.यावेळी शिक्षक व कर्मचारी सोनवणे ताई विद्यार्थीनी आणि विद्यार्थी उपस्थीत होते.



केज/प्रतिनिधी

सासुरा ता.केज येथील गोकुळ उगले यांनी स्व खर्चातून उभारलेल्या दत्त मंदिरात दत्तजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये दि.७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी रुद्राभिषेक व अखंड हवन प्रज्वलन तसेच दुपारी ५-०० वाजता श्री गुरुचरित्राचे सामूहिक पारायण संकल्प,व पूजा दि.९ डिसेंबर २०२४रोजी सकाळी १०-०० दत्तयाग व दत्तमाला मंत्राच्या आहुतीचे आयोजन केले आहे.दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ६-०० वाजता दत्तगुरुंना अभिषेक व आरती१०ते १२ ह.भ.प.श्री.केशव महाराज गीते शास्त्री (एकनाथ महाराज मठ संस्थान सासुरा) यांचे सुश्राव्य कीर्तन व दुपारी १२-०० नंतर महाप्रसाद.

संध्याकाळी ६-०० दत्त गुरूचा अवतार सोहळा, पाळणा गीत,फटाक्याची नयनरम्य आतिषबाजी व आरती संध्याकाळी ७-०० वाजता दत्त भक्तांना सेवा करत असताना आलेल्या स्वअनुभवाचे कथन,रात्री ८-०० ते ११-०० वेळेस ह.भ.प.गोपीचंद शास्त्री महाराज (गणेश नाथ आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था सासुरा) यांचे सुश्राव्य कीर्तन होईल.यादरम्यान सकाळी ७-३० ते ८-०० या वेळेत दत्तप्रभूची आरती होईल तरी वरील कार्यक्रमास उपस्थितराहून महाप्रसादा चा व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन गोकुळ उगले व परिवार सासुरा त्यांनी केले आहे.